## प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली
## हवामानावर आधारीत कृषि सल्ला (ठाणे व पालघर जिल्हा)
**(०२३५८) २८२३८७**

**अंक ८२/२०१८** **दिनांक १२/१०/२०१८** **कालावधी ५ दिवस**


**डॉ. सुभाष चव्हाण,**
विभाग प्रमुख,
कृषिविदया विभाग
९४२२४३१०६७

**डॉ. विजय मोरे,**
नोडल ऑफिसर,
कृषिविदया विभाग
९४२२३७४००१

**डॉ. शितल यादव,**
तांत्रिक अधिकारी
कृषिविदया विभाग
८३७९९०११६०


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक ०८/१०/२०१८ ते १२/१०/२०१८) | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक १३/१०/२०१८ सकाळी ८:३० पासून १७/१०/२०१८ सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०८/१० | ०९/१० | १०/१० | ११/१० | १२/१० | | १३/१० | १४/१० | १५/१० | १६/१० | १७/१० |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | **पाऊस (मिमी)** | ० | ० | ० | ० | ० |
| ३६.० | ३५.८ | ३३.० | ३३.६ | ३२.८ | **कमाल तापमान (अं.से)** | ३४ | ३४ | ३४ | ३४ | ३४ |
| २४.० | २५.२ | २४.६ | २३.६ | २३.५ | **किमान तापमान (अं.से)** | २६ | २६ | २६ | २६ | २६ |
| ० | ० | ० | ० | ० | **मेघाच्छादन (ऑक्टा)** | ५ | ४ | ३ | ४ | २ |
| ८३ | ८७ | ८८ | ९५ | ९२ | **सकाळची सापेक्ष आर्द्रता** | ६६ | ६१ | ६१५५ | ५६ | ९१ |
| ६७ | ६७ | ५५ | ७२ | ७३ | **दुपारची सापेक्ष आर्द्रता** | ४६ | ४५ | ४५ | ४२ | ४२ |
| २.५ | २.४ | २.१ | १.८ | २.८ | **वाऱ्याचा वेग (किमी/तास)** | ६ | ५ | ५ | ७ | ७ |
| - | - | - | - | - | **वाऱ्याची दिशा** | ईशान्य-पूर्व | आग्नेय | ईशान्य | पूर्व | पूर्व |

| पाऊस (मिमी) मागील आठवडयातील | पाऊस (मिमी) १/१/२०१८ पासून आजपर्यंत | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा |
|---|---|---|
| ०.० | २३५९.६ | २८३४.२ |

### हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला
**दिनांक १० ते १४ ऑक्टोबर २०१८ पर्यंत आकाश मेघाच्छादित राहील.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| भात | दाणे भरण्याची अवस्था ते पक्वता | • तयार झालेल्या भात पिकाची सकाळी 'वैभव" विळ्याने जमिनीलगत कापणी करून लगेच मळणी करून २ ते ३ उन्हे देऊन धान्य वाळवावे.<br>• सध्याच्या वातावरणात भात पिकावर लष्करी अळीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने तयार भात पिकाची कापणी करून घ्यावी. |
| नागली | दाणे भरण्याची अवस्था ते पक्वता | • नागली पिक तयार झाले असल्यास कणसे विळ्याने कापून उन्हात वाळवावीत नंतर मळणी करावी. |
| वाल | पूर्व मशागत व पेरणी | • खरीप भात कापणी नंतर वालाची पेरणी १५ ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबर या कालावधीत करावी. जमिनीत वापसा असताना एक वेळ नांगरट करून हेक्टरी ५ टन शेणखत किंवा कंपोस्टखत मिसळावे व जमीन समपातळीत आणून वालाची पेरणी प्रति हेक्टरी ३० ते ४५ किलो बियाणे टोकन पद्धतीने ३० x १५ से. मी. किंवा ३० x २० से. मी. किंवा ३० x ३० से. मी. अंतरावर करावी. |
| आंबा | पालवी | • आंब्यावरील बांडगुळे, मृत फांद्या तसेच निर्जीव फांद्या कापून फांद्यांची विरळणी करावी. तसेच फांदीवर रोग येवू नये म्हणून १ टक्के बोर्डो मिश्रण अथवा ०.२५ टक्के कॉपर ऑक्झीक्लोराईड ची संपूर्ण झाडावर फवारणी करावी.<br>• आंब्याच्या नवीन पालवीवर शेंडे पोखरण्याऱ्या अळी व मिजमाशीचा प्रादुर्भाव दिसून येत असल्याने कीडग्रस्त पालवी अळीसहित नष्ट करावी व क्विनालफॉस २५ टक्के प्रवाही २० मि. ली. किंवा मोनोक्रोटोफस ३६ टक्के प्रवाही ११ मि. ली. प्रति १० लिटर किंवा डायमेथोएट पाण्यातून फवारणी करावी. |
| सुपारी | -- | • पाऊस पडण्याची शक्यता नसल्याने सुपारी बागेत आवशक्यतेनुसार पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| भाजीपाला/ फळबाग रोपवाटिका | रोपवाटिका | • भेंडी व कलिंगडाची लागवड करण्यास हवामान उत्तम असल्याने लागवड पूर्ण करून घ्यावी.<br>• भाजीपाला तसेच फळबाग रोपवाटीकेस पाणी देण्याची व्यवस्था करावी.<br>• नर्सरी शेड मधील रोपे बाहेर काढावीत तसेच कलमांच्या जोडाच्या ठिकाणी बांधलेली पट्टी काढून टाकावीत व नवीन पालवीचे बुरशीजन्य रोगांपासून संरक्षण करण्यासाठी १ टक्का बोर्डो मिश्रणाची फवारणी करावी. |
| चिकू | फळधारणा | • चिकू बागेत फळगळ या बुरशीजन्य रोगाच्या नियंत्रणासाठी १ टक्का बोर्डो मिश्रणाची झाडावर फवारणी करावी.<br>• चिकू बागेमध्ये जुन्या झाडांची मुख्य फांदीची छाटणी व इतर फांद्यांची विरळणी करावी. |
| केळी | - | • जुन्या केळी लागवडीतील मुनवे काढून टाकावेत. |
| दुभती जनावरे/ शेळ्या/ कुकुटपालन | - | • जनावरांचे, शेळ्यांचे आणि कोंबड्यांचे वाढत्या तापमानापासून संरक्षण करावे.<br>• जनावरांना पिण्यासाठी स्वच्छ पाण्याची व्यवस्था करावी तसेच गोठ्यामध्ये हवा खेळती राहील याची काळजी घ्यावी. |

**सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून प्रसारित करण्यात आली.**

**अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा.**